म्हणाले, 'खळेअण्णा, तुम्ही कमाल केलीत. माझ्या गाण्याचं सोनं केलंत.' त्यांचं बोलणं ऐकून मी त्यांना म्हणालो, 'अण्णा, राग मानू नका. पण तुमच्या अगोदरच्या वागण्याने मला वाईट वाटले. सर्वजण सुधीर फडके होऊ शकत नाहीत, हे सत्य असले तरी नवीन माणसे अगदीच टाकाऊ असतील असे गृहीत धरणे चुकीचे.' अण्णा म्हणाले, 'मान्य. तुमचे नाव कधीच ऐकले नसल्याने गफलत झाली खरी.'

तेथून अण्णांचा आणि माझा स्नेहबंध जुळला. त्या चित्रपटाचे नाव होते- 'लक्ष्मीपूजन.' मग कामाला वेग आला. रामभाऊ म्हणाले, 'तुम्ही आशाकडून गाणी बसवून घ्या.' त्याप्रमाणे मी गाण्यांची तालीम आशाकडून करून घेतली. या सगळ्या धावपळीत महिना गेला. मी चित्रपटाचे निर्माते पोतनीस यांना विचारले की, 'गाणी कुठल्या स्टुडिओत रेकॉर्ड करायची ?' ते म्हणाले, 'जरा थांबा. पैशाची गडबड आहे.' पण त्यानंतर पैशाची सोय करणे त्यांना शक्य झाले नाही व त्यांनी ते कथानक 'प्रभात'च्या केळकरांना विकून टाकले. नवीन निर्मात्याने चित्रपटाचे नाव बदलून 'सुखाचे सोबती' असे केले व चित्रपटाचा संगीतकारही बदलला. वसंत पवारांना त्यांनी करारबद्ध केले. आपल्या नशिबात नव्हतं- अशा विचाराने मी त्याचा विचार करणे सोडून दिले.

त्यानंतर सुमारे दोन महिन्यांनी अण्णांची भेट झाली. अण्णांनी मला विचारले, 'काय, गाणी रेकॉर्ड झाली का ?' यावर मी त्यांना सर्व हकिकत सांगितली. ते सर्व ऐकून अण्णा म्हणाले, 'तुमच्या चाली अप्रतिम होत्या. तुम्ही त्याची वेगळी रेकॉर्ड एच.एम.व्ही. बरोबर का नाही करीत ?' मी त्यांना म्हणालो, 'एच.एम.व्ही.मध्ये मला कोण उभे करणार ?' अण्णा म्हणाले, 'मी सांगतो त्या अधिकाऱ्याला जाऊन भेट.' त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी स्टुडिओत जाऊन त्या अधिकाऱ्याला भेटलो. ते म्हणाले, 'आत्ता मी कामात आहे. बाहेर बसा. मी मोकळा झालो की तुम्हाला बोलावीन.' संध्याकाळी साडेपाचपर्यंत मी बाहेर वाट बघत बसलो. गरजवंताला अक्कल नसते, हेच खरे. ज्या- वेळी ते अधिकारी घरी जायला निघाले तेव्हा त्यांनी मला पाहिले व म्हणाले, 'तुम्ही अजून येथेच बसलेले आहात ? मला येऊन भेटला का नाहीत एवढ्या वेळात ?' मी म्हणालो, 'तुम्ही मोकळे झालात की बोलवतो, असे म्हणाला होता म्हणून मी वाट पाहात थांबलो.' मग ते म्हणाले, 'आता तुम्ही घरी जा व दोन दिवसांनी या.' दोन दिवसांनी गेलो तेव्हा ते म्हणाले, 'आज फारच गडबड आहे. ऐकावयास वेळ नाही. पुन्हा केव्हातरी बसूया.'